नि.दिवाणी मु.क्र. ९८/२०२१
गिताबाई वि. रामकृष्ण
नि.क्र. ५४ खाली.

<u>**सरतपास प्रतिवादी तर्फे ॲड. श्री. आर.डी. वासनकर यांचेमार्फतः–**</u>

माझे प्रतिज्ञापत्रातील मजकुर खरा व बरोबर असुन मी त्यावर वाचुन व समजुन सही केली ते नि.क्र. ५४ वर आहे. मनाबाई फकीरजी आमझरे या माझी आजी सासु (सास–याची आई) होत्या. मनाबाई हिने दि. २४.०५.२०२१ रोजी अमरावती येथे मृत्युपत्र केले होते. सदरचे मृत्युपत्र लिहुन झाल्यानंतर मनाबाई हिला वाचुन दाखविले होते. त्यानंतर मनाबाई यांनी माझे समक्ष त्यावर अंगठा केला. आता मला सदरचे मृत्युपत्र दाखतवले. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर साक्षीदार म्हणुन माझी सही आहे. तसेच दुसरे साक्षीदार म्हणुन त्यावर शशिकला बोरवार यांचा अंगठा आहे, सदरचे मृत्युपत्रास <u>**नि.क्र.५५**</u> देण्यात येतो.

<u>**उलटतपास वादीतर्फे ॲड. श्री. ए. बी. कडु यांचेमार्फतः–**</u>

२. रामकृष्ण आमझरे माझे सासरे आहेत. रामकृष्ण आमझरे यांना चार बहिणी असुन ते एकटेच आहेत. सुकळी ते हिरुळ पर्यंतचे अंतर ३५ ते ४० कि.मी. एवढे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मनाबाई यांना सन २०१६ मध्ये पॅरेलिसीसचा अटॅक आला होता. हे म्हणणे खरे नाही की मनाबाई यांना व्यवस्थीत चालता व बोलता येत नव्हते. अमरावती येथे सदरचे मृत्युपत्र ज्याचेकडे तयार केले त्याचे नांव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मृत्युपत्रात नमुद मिळकतीचा गट क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मनाबाई यांना लिहीता व वाचता येत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे मृत्युपत्र माझे समक्ष तयार केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष मनाबाई यांनी मृत्युपत्रावर अंगठा केला नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४.०५.२०२१ रोजी मनाबाई अमरावती येथे हजर नव्हत्या. मला मृत्युपत्रासाठी स्टॅम्प घेतल्याची तारीख सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष सदरचा स्टॅम्प घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, शशिकला या सुध्दा साक्षीदार म्हणुन मृत्युपत्राचे वेळी हजर नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे मृत्युपत्र रामकृष्ण आमझरे यांनी पुर्वीच तयार करुन ठेवले होते व नंतर त्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मनाबाई यांनी माझे समक्ष मृत्युपत्रावर अंगठा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र तयार करुन आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास– नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

माझे समक्ष,

दि. ११.०२.२०२५

**(जी.एम.नदाफ)**
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
चांदुर बाजार.